REVIEW OF RESEARCH

ग्रामीण साहित्याचा उगम

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019

डॉ. लक्ष्मण बळीराम थिट्टे

सहाय्यक प्राध्यापक, कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, नळदुर्ग.

ग्रामीण साहित्य अभ्यासण्यापूर्वी ज्या परिसरात ते फुलले तो परिसर तेथील जीवनपद्धती, संस्कृती अभ्यासणे आवश्यक आहे म्हणजेच खेड्याचे स्वरूप समजावून घ्यावे लागेल.

जगातल्या कोणत्याही देशातल्या समाजाचा आढावा घेतला तर असे दिसून येते की, प्रत्येक देशात निदान अर्ध्यापेक्षा जास्त लोक त्या देशाच्या ग्रामीण भागातच राहत असतात. शहर व नगरात राहणाऱ्यांची संख्या तुलनात्मकदृष्ट्या खूपच कमी आहे. भारतासारख्या खेडे आणि शेतीप्रधान देशातील जवळपास ७९ टक्के लोक ग्रामीण भागातच राहतात. देशातील एवढी मोठी लोकसंख्या खेड्यात राहत असल्याने भारताला खेड्यांचा देश म्हटले जाते. तेव्हा भारत बघायचा असेल तर तो खेड्यात बघितला म्हणजे त्याचे एकंदरीत स्वरुप कसे आहे हे लक्षात येते आणि म्हणून ग्रामीण समाज हा नागरी समाजाहून वेगळा तर आहेच, परंतु त्याचबरोबर त्यांची स्वत:ची अशी खास वेगळी वैशिष्ट्येसुद्धा आहेत. जीवन जगण्याची पद्धत, रूढी, परंपरा सामाजिक समस्या व सामाजिक संबंध यासारख्या अनेक बाबतींत नागरी समाजापेक्षा ग्रामीण समाज खूपच वेगळा आहे. ग्रामीण लोकांवर नैसर्गिक पर्यावरणाचा खूप मोठा प्रभाव असतो. जसा भूभाग वातावरण आणि जीवनपद्धती असेल त्याप्रमाणे या लोकांची संस्कृती आकाराला आलेली असते. व्यवसाय, उद्योग, धार्मिक कल्पना, विवाहपद्धती, कुटुंबाची रचना, सामाजिक संघटन, सामाजिक गतिमत्व आणि शेवटी जीवन पद्धती इत्यादींच्या संबंधात असणारे त्यांचे समज-अपसमज आणि वेळोवेळी त्यात होणारे बदल हे त्या-त्या समाजातील संस्कृतीमुळे घडून येत असतात.

मुख्य शब्द: खेड्याचे महत्त्व, शेती आणि वस्ती, प्रादेशिक साहित्य.

प्रस्तावना :

• खेडे :

खेडी वसली कशी? व्यक्तीची एकांगी जीवन जगण्याची अवस्था संपल्यावर जेव्हा ती समूह करून राहू लागली, तेव्हा तिची भटकंती संपून ती एका विशिष्ट भूभागावर स्थिरावली. कंदमुळे, शिकार, मांस, मद्य या अशा अनेक वस्तूंच्यावर उदरनिर्वाह करून भटकंती करणे हे आदिम अवस्थेतील माणसाचे जीवनकार्य होते. पुढे जमिनीची मशागत करून तिच्यातून जीवनोपयोगी धान्याची निर्मिती करण्याची कला आत्मसात झाल्यावर मानवी जीवन अधिक स्थिरावले. एकटे-दुकटे किंवा एक वा दोन व्यक्तीने समूह करून राहण्याचे दिवस संपले. पोट भरण्यापुरती जेथे पिकास योग्य जमीन आहे. वस्तीजवळच पिण्याच्या पाण्याची सोय आहे. जळणाची सोय आहे आणि विशेष म्हणजे हवामान अनुकूल आहे अशा ठिकाणी मानवाने राहण्यास पसंद केले. गटागटाने वस्ती करून राहू लागले. याप्रकारेच खेडी अस्तित्वात आली. ही खेडी माळरानावर, डोंगरपायथ्याशी, नदीपासून खूप अंतरावर आणि नदीकाठावर आढळून येतात. ही आकारमानाने लहान-मोठी आहेत. लोकसंख्या कमी असल्याने आत्मीयता, त्याग, स्नेह आणि सहकार्याची भावना खेड्यातील लोकांमध्ये दिसून येते.

खेडे म्हटल्याबरोबर नजरेसमोर येतात ती खेड्याभोवतालची जमीन आणि

एकमेकांशेजारी वसलेली घरे,परंतु सगळीकडेच असे चित्र दिसून येत नाही. पावसाचे प्रमाण, हवामान, जमिनीचे स्वरुप आणि तिच्यावर आधारित असलेली पिके, वनस्पती इत्यादींवर वस्तीचे स्वरुप आधारित असते. एकदा वस्ती अस्तित्वात आली की, जमिनीचा प्रकार, पर्जन्यमान व चालीरीतीला अनुसरुन संस्कृती तयार होते. या संस्कृतीला अनुसरुन लोकांना जीवन जगावे लागते. सर्वसाधारणपणे भारतात तीन प्रकारच्या वस्त्या दिसून येतात. त्या महाराष्ट्रातही दिसून येतात. त्या पुढीलप्रमाणे :

१) केंद्रित वस्ती किंवा गाव : अशाप्रकारची वस्ती प्रामुख्याने नदीच्या काठावर, कालव्यांची व्यवस्था असलेल्या भागात सुपीक जमीन आणि दळणवळणाच्या मार्गावर अस्तित्वात आलेली असते. अशा ठिकाणी जाणीवपूर्वक अनेकविध कारणांमुळे नवीन वस्तीसुद्धा वसविली जाते. ज्या जमिनी लागवडीखाली आणलेल्या असतात त्या प्रामुख्याने सलग आणि भोवताली पसरलेल्या असतात. अशा जमिनीच्या मध्यभागी एकत्र वस्ती असणाऱ्या गावांना केंद्रित गाव असे म्हटले जाते. या वस्त्या अशा ठिकाणी असतात की, प्रत्येकाची जमीन सारख्या अंतरावर असावी. प्रसंगी सारख्या अंतरावरील लोकांना एकमेकांच्या मदतीला धावून जाता यावे म्हणून ही व्यवस्था केलेली असते. गावाची हद्द निश्चित झालेली असते. परंतु गावाच्या सीमा मात्र एकमेकांत मिसळून गेलेल्या असतात. सर्वच भागात अशी खेडी आढळत नाहीत.

२) पसरलेली वस्ती : महाराष्ट्रात अशा वस्त्यांचे प्रमाण अधिक आहे. कोकणात रस्त्याच्या दोन्ही बाजूंना लांबच लांब घरांची रांग लागलेली असते. घरांच्या सभोवताली नारळ पोफळी आणि इतर अनेक प्रकारच्या फळांची झाडे लावलेली असतात. अशा घरांभोवती कुंपण लावलेली असतात. घराघरांत कमालीचे अंतर असते. शेते घराला खेटूनच असतात. गावठाण कोठून सुरू होते आणि कोठे संपते हे सहजासहजी लक्षात येत नाही.

३) तुरळक वस्ती : या वस्तीचे स्वरुप शेतजमीन आणि तिची उपलब्धता यावर अवलंबून असते. दुर्गम अशा भागात या वस्त्या दिसून येतात. घरांची संख्या हाताच्या बोटावर मोजण्याइतकी असते. म्हणून यांना गावाचा दर्जाही नसतो. अशा अनेक वस्त्या मिळून एक गाव बनते. सह्याद्री व सातपुड्याच्या डोंगराळ प्रदेशात अशा वस्त्या दिसून येतात.

तिन्ही प्रकारच्या वस्त्यांच्या बाबतीत रस्त्यांचा उपयोग आणि स्वरुप वेगवेगळे आहे असे दिसून येते. केंद्रित गावाच्या बाबतीत रस्त्यांचा उपयोग दोन वा अधिक गावांना जोडण्यासाठी असतो. गावातील जे रस्ते असतात ते प्रामुख्याने अरूंद तर असतातच पण त्याचबरोबर वाकडेतिकडे म्हणजे नागमोडी वळणाचेसुद्धा असतात. तसेच पसरलेल्या वस्तीच्या प्रकारात प्रामुख्याने गावातला जो मोठा रस्ता असतो तो एकाच रांगेत असणाऱ्या गावांना जोडणारा असतो. याउलट तुरळक वस्तीच्या बाबतीत मात्र रस्ते क्वचितच असतात. विशेष करून पायवाटा त्याच वेगवेगळ्या वस्त्यांना जोडणाऱ्या दुवा समजल्या जातात. अशा पायवाटा कमीअधिक प्रमाणात प्रत्येक प्रकारात दिसून येतात.

घरांची रचना आणि नमुना याबाबतीत तिन्ही प्रकारात समानता आढळून येत नाही. रचना आणि नमुने भिन्न प्रकारचे असल्याने येथील लोकजीवन समान स्वरुपाचे दिसून येत नाही. जेथे केंद्रित वस्ती वा गाव असते तेथे घरांना स्वतंत्र असे व्यक्तिमत्त्व नसते. अनेक घरांच्या गर्दीत प्रत्येकाचे अस्तित्व गुदमरलेले असते. गावप्रमुखांच्या घराचा मात्र अपवाद असतो. त्याचेच घर फक्त एकांतात व अलग असते. पसरलेल्या वस्तीत मात्र घरे सुटी असतात. घराभोवती कुंपन असते. तुरळक वस्तीत घरे एकमेकांच्या समोर एका मोठ्या अंगणात बांधलेली असतात.

वरील सर्व तत्त्वांना अनुसरुन खेडी वसली आहेत. त्यानुसार त्यांची रचना दिसून येते.

ग्रामीण साहित्य ही संकल्पना मराठी साहित्यात व इतर भारतीय साहित्यात २० व्या शतकात उदयास आली आहे. 'ग्रामीण' या विशेषणातील मूळ धातू 'ग्राम' आहे. हा मूळ संस्कृतमधील शब्द सामान्य नाम या प्रकारातील आहे. मराठीमध्ये याचा अर्थ गाव असा आहे. खेडेगाव, शेतीवस्ती असे आणखीही अर्थ रूढ आहेत. परंतु ग्राम याचा नेमका अर्थ गाव असाच आहे. 'ग्रामीण' म्हणजे गावाकडील किंवा गावाशी निगडित असे म्हणता येईल. ''खेडणे म्हणजे जमीन कसणे आणि खेडूत म्हणजे जमीन कसणारा. तेव्हा खेडूतांची जी वस्ती ते खेडेगाव.'' या शब्दात त्रि.ना. अत्रे यांनी खेड्याची व्याख्या केली आहे.

ग्रामीण ही संकल्पना समजावून घेण्यापूर्वी भौगोलिक, व्यावसायिक, सामाजिक अशा पातळीवर नागर व ग्रामीण हे लोकवस्तीचे दोन भेद गृहीत धरावे लागतात. आणि ते प्राचीन काळापासून अस्तित्वातही आहेत. थोडक्यात नगरापासून दूर असलेली शेती व निसर्गाशी निगडीत अज्ञान व दारिद्र्यात जीवन जगणारी शेतकऱ्यांची वस्ती म्हणजेच खेडे किंवा ग्राम होय. नागरी समुदायाचा उगम ग्रामीण समुदायातूनच झालेला आहे. मानवाची भटकंती संपली. तेव्हा तो जेथे स्थिर झाला, त्याठिकाणी शेती आणि वस्ती या दोन बाबींची पूर्तता करून घेतली. शेतीमुळे पोटाचा प्रश्न सुटला तर वस्तीमुळे समुहात राहून निवाऱ्याचा प्रश्न निकालात निघाला. येथेच ग्रामीण समुदाय जन्मास आला. पुढे जसजसा काळ बदलत गेला तसतशा माणसाच्या जीवनातही

असंख्य उलाढाली घडून आल्या. मानवी जीवनाच्या या अखंड विकासात ग्रामीण समुदायाचे स्वरुपसुद्धा काळाबरोबर हळूहळू बदलत गेले.

शासकीय सोय, व्यापाराची उलाढाल, शिक्षणविषयक सुखसोयी, दवाखाना, इत्यादींची परिपूर्ण पूर्तता खेड्यातून होणे शक्य नव्हते. तेव्हा सोय म्हणून एका विशिष्ट खेड्यात सर्व सोयींची व्यवस्था करण्यात आली. हळूहळू हे विशिष्ट खेडे भौगोलिक दृष्टीने विस्तृत आणि लोकसंख्येच्या बाबतीत अधिक लोकसंख्येचे आगर व केंद्र बनले आणि येथेच नगर वा शहराचा जन्म झाला. नागरी समुदायाचा उगम ग्रामीण समुदायातून झाला असला तरी दोन्हीच्या रचना आणि कार्यात कमालीचा फरक आहे. घरांची रचना, व्यवसाय, दैनंदिन जीवनपद्धती, खानपान यात फरक आहे. खेड्याचे जीवन मात्र कृषिजीवनाशी निगडित आहे. निसर्गाशी प्रत्यक्ष संबंध खेड्यातील लोकांचा येतो. खेड्याचे नेमके स्वरुप आनंद यादव स्पष्ट करतात. ''खेडेगाव तेथील जीवनपद्धती, तेथील खास अशा रिती, शेती, तेथील निसर्गाशी मातीशी असलेले मानवीपण, प्रदेशनिष्ठ वैशिष्ट्यपूर्ण संबंध तेथील संस्कृतीला लाभलेली काही प्रादेशिक वैशिष्ट्ये, मानवी जीवनाला याच प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, ज्ञानविषयक मर्यादा व त्यातून उद्‌भवणारे प्रश्न आणि समस्या.'' या साऱ्यांचा समावेश 'ग्रामीण' या संज्ञेत करता येईल. ग्रामीण समुदाय या शब्दप्रयोगाने समाईक परंपरा रूढी, समाईक हितसंबंध, एक स्वायत्त व स्थानिक अशी शासन-यंत्रणा आणि स्वत:च्या गरजा या फारसे इतर गावावर अवलंबून न राहता भागविण्याची स्थानिक सोय, यासह परस्पर साह्याने एकत्रित राहून जीवन जगणाऱ्या जमीनधारकांचा अगर शेतकऱ्यांचा समुह सुचित होतो. अर्थात खेड्यात सर्वच लोक जमीनधारक नसतात. तेव्हा जमिनीशी संबंधित व्यवसाय करणारे व जमिनीवर मजुरी करून पोट भरणाऱ्यांची संख्यासुद्धा खेड्यात असते. याशिवाय शेतीला सहाय्य करणारे बलुतेदार, अलुतेदार हेही असतात. अनेक फिरस्ते, भटक्या जमाती यांच्याशिवायही खेड्याला पूर्णत्व नाही. नागरी वस्तीपेक्षा खेडे अनेक दृष्टीने वेगळे आहे.

ग्रामीण साहित्याचा उगम :

'ग्रामीण साहित्य' ही संज्ञा २० व्या शतकात रूढ झाली असली तरी मराठी भाषेच्या प्रारंभापासूनच लोकसाहित्याच्या रूपाने प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. मराठीतील प्रारंभीचे ग्रंथ अध्यात्मिक असले तरी ग्रामीण पार्श्वभूमी त्यांना आहे. समकालीन ग्रामीण जीवनातील अनेक संदर्भ या ग्रंथातून दिसून येतात. महानुभाव संप्रदायाचे प्रवर्तक चक्रधर स्वामी यांचे आयुष्य मराठवाड्यातील ग्रामीण भागात गेले. त्यांच्या आठवणींवर लिहिलेला ग्रंथ 'लीळचरित्र' या चरित्र ग्रंथात अनेक ग्रामीण संदर्भ आले आहेत. शेती हा खेड्याचा प्रमुख व्यवसाय. या व्यवसायातील अनेक दृष्टांत दिले आहेत. भक्ताचे मन कसे असावे यासाठी हा दृष्टांत दिला आहे.

'ऐसीं एकें सुक्षेत्रे असति : भूमी बीयां मेळा पकू की जे'
आणि भारू आथौनि पीकति : एकें नांगरवेऱ्ही उलखीजति :
धाटे वापे पेरीजति : परि तेथ बीही न निगे : ।।
(लिळाचरित्र एकांक लिळा क्र.२५)

एखाद्या सुपीक जमिनीत बी पेरताच अमाप पीक येते, तर एखादी जमीन नापीक बरडाची असेल तर नांगरून - मशागत करूनही पेरलेले बीदेखील निघत नाही. हुरड्याला आलेल्या जोंधळ्यावरील पाखरे मारण्याचा उल्लेख ५६ क्र. लिळेत आढळतो. शेतीला पूरक व्यवसाय म्हणजे गुरे राखणे. (लिळा क्र.३८) दुसऱ्याच्या शिवारात गुरे चारणे.(३४) याचे चित्रण आले आहे. गुराख्यांची गरीब आर्थिक स्थितीचे दर्शन ३३ व्या लीळेत घडते. गुराखी आजारी पडतो. तेव्हा त्याची वृद्ध आई आता गुरे दुसऱ्या गुराख्याकडे जातील म्हणून बेचैन होते.

ग्रामीण लोकरितीचे चित्रणही लीळाचरित्रात आलेले दिसून येते. पुत्रजन्म, बारसे, उष्टावन, विवाह समारंभ, सीमांत पूजन, मूळ पाठवणे, काडीमोड, मृतदेहाचा निक्षेप, उत्तरक्रिया इ.चे उल्लेख आढळतात.

तेली, चर्मकार व त्यांचे व्यवसाय, द्यूत खेळणे, होड (स्पर्धा) लावणे, रानभेरीचा खेळ याचेही चित्रण आले आहे.

ज्ञानेश्वरी मध्येही शेती व अन्य व्यवसाय व निसर्गाशी निगडीत अनेक दृष्टांत आले आहेत. वासुदेव आणि पिंगळा ही रूपकेही वापरली आहेत. नामदेवांचे अनेक अभंग कुणबी कुळवाडीशी निगडित आहेत.

'आम्हा कीर्तन कुळवाडी । आणिक नाही उदीम जोडी ।
वाचा पिकली पिकली । हरिनामाची वरो झाली ।। '
(नामदेव गाथा शासकीय प्रत, पृ.७०४)

आम्ही कुळवाडी आहोत. शेती हा आमचा मुख्य व्यवसाय आहे. सावता माळी तर स्वत: माळी असल्यामुळे शेती हा तर त्यांचा व्यवसायच होता. पिकांच्या पालेभाज्यांच्या रूपात त्यांनी विठ्ठलाला पाहिले.

कांदा मुळा भाजी । अवघी विठाई माझी ।।१।।
लसूण मिरची कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरी ।।२।।
मोट नाडा विहिर दोरी । अवघी व्यापिली पंढरी ।।३।।
सावता म्हणे केला मळा । विठ्ठलपायी गोविला गळा ।।४।।
(श्री सावता माळी : सकलसंत गाथा, पृ.९८)

एकनाथांनी कारू-नारू व फिरस्ते यांच्यावरती शेकडो रूपके लिहिली आहेत. अध्यात्म शिकवणीसाठी संपूर्ण ग्रामपरिसरच वापरला आहे. बहुजन समाजाला परिचित असलेले ग्रामविश्व एकनाथांनी आपल्या भारूडांमधून प्रकट केल्यामुळे ग्रामीणत्वाच्या खुणा त्यांच्या भारूडातून सापडतात.

अरूता ये बैला । कारे वेड्या ।।१।।
काय बोले वेडी । कोण उपडितो पेढी ।।२।।
पेंढी उपटणार तुंचि झाला । पुरता विचार करूनी बोला ।।३।।
(सकलसंत गाथा, पृ.७३५)

तुकारामांच्या अभंगातून व त्यानंतर आलेल्या शाहीरी कवितेतूनही नकळतपणे ग्रामीण जीवन चित्रित झालेले दिसून येते. ग्रामीण भागातून शाहीर पुण्यास आले होते. त्यामुळे बरेच आयुष्य त्यांचे खेड्यात गेले होते.

वरील विवेचनावरून असे दिसून येते की, प्रारंभापासूनच नकळतपणे ग्रामीण भागाचे चित्रण आले आहे. कारण तत्कालीन साहित्याचे निर्मातेच ग्रामीण भागातील होते. अध्यात्म व तत्त्वज्ञान निरुपणासाठी दृष्टांताशिवाय पर्याय नाही. हे दृष्टांत ग्रामीण जीवनाशी निगडित असल्याचे दिसून येतात. ग्रामीण जीवन चित्रित करणे हा काही प्राचीन साहित्यामागचा हेतू नाही. परंतु ग्रामीण जीवनस्तरावरचे काही अनुभव प्रकट होत असल्यामुळे, अनुषंगाने अगदी सहजपणे या लेखनात ग्रामीण जीवनचित्रण येऊन जाते. मध्ययुगीन कालखंडात नकळतपणे ग्रामीण जीवनाला स्पर्श झाला. खऱ्या अर्थाने ग्रामीण जीवन डोळ्यासमोर ठेवून सर्वात प्रथम महात्मा फुले यांनी साहित्य लेखन केले. त्यांच्याच प्रेरणेने पुढे रा.वि.टिकेकर व कृष्णराव भालेकर यांनी ग्रामीण कादंबरी लेखन केलेले दिसून येते.

साधारणपणे १९२० पर्यंत मराठी साहित्यामध्ये खेड्याला फारसे स्थान नव्हते. साहित्य लेखनाची मक्तेदारी घेतलेल्या पुणे-मुंबईकर मंडळींच्या लेखनाचा विषय ग्रामीण माणूस झालाच नाही. शिक्षणाअभावी ग्रामीण लेखकांची वाणवाच होती. खेड्याचे महत्त्व, सामर्थ्य सर्वप्रथम गांधीजींनी ओळखले. स्वातंत्र्यलढा तीव्र करायचा असेल तर खेड्यामध्ये राहणाऱ्या बहुसंख्य लोकांना सामावून घेतले पाहिजे याची जाणीव झाली. म्हणून 'खेड्याकडे चला' अशी हाक दिली आणि यावेळी मध्यमवर्गीय लेखकांचे लक्ष खेड्याकडे गेले व साहित्यामधून ग्रामीण जीवनाचे चित्रण येण्यास सुरुवात झाली. प्रारंभीचे हे चित्रण कितपत वास्तव होते याविषयी मात्र शंका आहे.

'ग्रामीण साहित्य' ही संकल्पना एखाद्या प्रदेशांतर्गत जीवनातून निर्माण झालेल्या साहित्याला योजली आहे. ग्रामीण साहित्याला 'प्रादेशिक साहित्य' असेही म्हटले जाते. परंतु याबाबत एकमत नाही. त्यामुळे ''प्रादेशिक साहित्याच्या मोठ्या वर्तुळात काढलेले छोटे वर्तुळ म्हणजे ग्रामीण साहित्य.'' अशी भूमिका घेतली जाते. म्हणून ''ग्रामीण साहित्य हे ग्राम जीवन, ग्राम संस्कृती व ग्रामीण समाज व्यवहाराच्या जाणीवा व्यक्त करणारे साहित्य आहे.'' हे साहित्य ग्रामीण जीवन, संस्कृती आणि समाज या तीन शब्दाच्या माध्यमातून साकार होते.

निष्कर्ष:

हे साहित्य खेड्याशी संबंधित असल्यामुळे खेड्याचे स्वरूप व रचना महत्त्वाची आहे.'गावगाडा' ही व्यवस्था खेड्यात दिसून येते. या गावगाड्यामुळेच खेडे स्वयंभू होते. हे साहित्य एकाएकी अपघाताने निर्माण झाले आहे असे म्हणता येणार नाही. १९२० नंतर हा प्रवाह उदयास आला असला तरी, संत, पंत, तंत साहित्यात प्रत्यक्षाप्रत्यक्ष ग्रामीण जीवनाचे संदर्भ आलेले आहेत. परंतु हे चित्रण जाणीवपूर्वक केलेले होते असे म्हणता येणार नाही.

संदर्भ टीपा:

१. त्रि.ना.अत्रे : 'गावगाडा', आर्यभूषण छापखाना, पुणे, आवृत्ती पहिली, १९१५, पृ.२
२. आनंद यादव : 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृतीयावृत्ती, १९९३, पृ.९
३. तत्रैव: पृ.४०
४. तत्रैव: पृ.१०
५. तत्रैव: पृ.१०